कृष्णाई शिक्षण प्रसारक मंडळ लातूर संचलित,

# जनविकास महाविद्यालय

बनसारोळा, ता.केज, जि.बीड ४३१५१८

## माहिती पुस्तिका

**वरिष्ठ महाविद्यालय**

(कला, विज्ञान व वाणिज्य)

२०१९-२०

**डॉ. बाबासाहेब गोरे**

प्राचार्य,

जनविकास महाविद्यालय

बनसारोळा, ता.केज, जि.बीड

E-mail : principaljanvikas@rediffmail.com


Website : www.janvikasmb.org

# कृष्णाई शिक्षण प्रसारक मंडळ

## संचालक मंडळ




सौ. राजामती आत्माराम तट
अध्यक्ष



श्री. युवराज मनोहरराव गोरे
उपाध्यक्ष



डॉ. बाबासाहेब मनोहरराव गोरे
सचिव



श्री. अशोक हणमंत जाधव
सहसचिव



सौ. लता बाबासाहेब गोरे
कोषाध्यक्ष



श्री. भागवत गणपतराव गोरे
सदस्य



सौ. संगीता गोपाळ काकडे
सदस्य

विद्या, विनय, शील - हीच दैवते

कृष्णाई शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

# जनविकास महाविद्यालय

**बनसारोळा, ता. केज, जि.बीड ४३१५१८**

## : माहिती पुस्तिका :

वरिष्ठ महाविद्यालय (कला, विज्ञान व वाणिज्य)

सन : २०१९-२०२०


: प्रकाशक :

**डॉ. बाबासाहेब म. गोरे**

**प्राचार्य,**

**जनविकास महाविद्यालय, बनसारोळा**

Email : principaljanvikas@rediffmail.com

Website : www.janvikasmb.org

**प्राचार्यांचे मनोगत...**



सर्वप्रथम शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयात सर्वांचे मनःपूर्वक स्वागत ! हे वर्ष आमच्यासाठी खुप महत्वाचे आहे त्यामागे कारण ही तसेच आहे. २०००-२००१ मध्ये सुरु झालेले वरिष्ठ महाविद्यालय २० व्या वर्षात पदार्पण करत आहे.

महाविद्यालय २० व्या वर्षात पदार्पन करत असल्याने महाविद्यालयाने विद्यार्थी केंद्रीत अशा बऱ्याच गोष्टींचे नियोजन या शैक्षणिक वर्षात करण्याचे ठरवले आहे व ते पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद तर आहेच त्याचबरोबर विद्यार्थी, त्यांचे पालक यांच्या सहकार्याची मी अपेक्षा करतो.

ग्रामीण भागात महाविद्यालय आहे म्हणून याठिकाणी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सर्व भौतिक सुविधा यात महाविद्यालयासाठी प्रशस्त, आधुनिक, सर्व सुविधांनीयुक्त अशी इमारत संस्थेने खुप परिश्रमातून उपलब्ध करुन दिली आहे. त्याच बरोबर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संगणकीकृत व आधुनिक ग्रंथालय, सुसज्ञ अशा विज्ञान, भूगोल विषयाच्या प्रयोगशाळा, संगणक तंत्रज्ञान प्रयोगशाळा (ज्यात विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट WiFi ची सुविधा उपलब्ध आहे ) ही अद्यावत केलेली आहे.

विद्यार्थ्यांच्या शारीरीक व आरोग्य विषयक प्रगतीसाठी संस्थेने इनडोअर हॉल-त्यातील विविध क्रिडा प्रकार व ऑऊट डोअर क्रिंडागण-त्यातील विविध क्रिडा प्रकार सर्व साहित्य प्रशिक्षकासह उपलब्ध करुन दिले आहे. त्याचबरोबर जीम मध्ये व्यायामासाठी सर्व प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे.

विद्यार्थीनींच्या शिक्षणासाठी राहण्याची अडचण लक्षात घेऊन विद्यार्थीनींकरीता महाविद्यालय परिसरातच अत्यल्प दरामध्ये वसतिगृहाची सोय, ती ही सर्व सोयीनीयूक्त उपलब्ध आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या वीद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयाने कला, विज्ञान व वाणिज्य शाखेच्या निकालाची उज्वल परंपरा या वर्षीही कायम राखली आहे. विद्यार्थी आपल्या भविष्यकालीन योजनेत यशस्वी होतील यासाठी पारंपारीक शिक्षणासोबतच भविष्यातील आव्हानांकरीता त्यांची सर्वांगीण तयारी करुन घेतली जाते.

ग्रामीण भागातील विद्यार्थी हा आजच्या स्पर्धेच्या युगात टीकला पाहिजे यासाठी त्याची स्पर्धापरीक्षेची तयारी महाविद्यालयात व्हावी यासाठी विशेष प्रयत्न आम्ही करत आहोत व त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होताना दिसत आहे. त्यामुळे पारंपारीक शिक्षणाबरोबर त्यास पुढील शिक्षणासाठी असणाऱ्या पात्रता परीक्षेचीही तयारी करुन घेत आहोत. या सर्वांचा त्याच्यावर खुप छान प्रभाव पडत आहे.

पालकांनी आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शिक्षणासाठी आमच्या महाविद्यालयाची निवड ज्या विश्वासाने केली त्या विश्वासाला निश्चितच आम्ही सार्थ करुन दाखवू कारण विद्यार्थी केंद्रीत शिक्षण व विशेषकरुन ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण यासाठी सदैव आमची प्राथमिकता राहीली आहे आणि रहाणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये आपण सहभागी व्हाल ही रास्त अपेक्षा ठेवून आपले स्वागत व उज्ज्वल यशासाठी हार्दिक शुभेच्छा..!

डॉ. बाबासाहेब मनोहरराव गोरे
प्राचार्य

# जनविकास महाविद्यालय, बनसारोळा

## * महाविद्यालय विकास समिती *

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ सेक्शन ९७ (१) नुसार)

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | सौ. राजामती आत्माराम तट | अध्यक्ष |
| २. | सौ. लता बाबासाहेब गोरे | सदस्य |
| ३. | प्रा.डॉ. हरिदास गुणवंत पिसाळ | सदस्य |
| ४. | प्रा.डॉ. गोपाळ शंकरराव भोसले | सदस्य |
| ५. | प्रा.डॉ. संगीता दत्ताजी मोरे | सदस्य |
| ६. | प्रा.डॉ. मोहन श्रीरंग कांबळे | सदस्य |
| ७. | श्री. सुधाकर विनायकराव गोडसे | सदस्य |
| ८. | प्राचार्य डॉ. रामचंद्र तुकाराम देशमुख | सदस्य |
| ९. | श्री. सोपान हणूमंत गोरे | सदस्य |
| १०. | प्रा.डॉ. बालाजी ज्ञानोबा कांबळे | सदस्य |
| ११. | श्री. संतोष भगवान शिनगारे | सदस्य |
| १२. | प्रा.डॉ. मुरलीधर अच्युतराव लहाडे | सदस्य |
| १३. | प्राचार्य डॉ. बाबासाहेब मनोहरराव गोरे | सदस्य सचिव |

# जनविकास महाविद्यालय, बनसारोळा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | डॉ. बाबासाहेब मनोहरराव गोरे | एम.कॉम., एम.ए., एम.एड., पीएच.डी. | | प्राचार्य |
| ❊ सहयोगी व सहाय्यक प्राध्यापक - कला शाखा ❊ | | | | |
| अ.क्र. | नाव | पद | शैक्षणिक अहर्ता | विषय |
| १. | डॉ. हरिदास गुणवंतराव पिसाळ | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., बी.एड., पीएच.डी. | भूगोल |
| २. | डॉ. मुरलीधर अच्युतराव लहाडे | सहयोगी प्राध्यापक | एम.ए., बी.एड., एम.फिल.,पीएच.डी. | हिंदी |
| ३. | डॉ. गोपाळ शंकरराव भोसले | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., पीएच.डी. | हिंदी |
| ४. | डॉ. मोहन श्रीरंग कांबळे | सहयोगी प्राध्यापक | एम.ए., पीएच.डी.,सेट,नेट | मराठी |
| ५. | डॉ. संगीता दत्ताजी मोरे | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., पीएच.डी., नेट | मराठी |
| ६. | अविनाश अर्जुन माने | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., एम.फिल. | इंग्रजी |
| ७. | डॉ. सतिश रावसाहेब कदम | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., एम.फिल.,पीएच.डी | इतिहास |
| ८. | डॉ. गीतांजली सदाशिवराव मोटे | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए.,बी.एड.,एम.फिल.,पीएच.डी. | समाजशास्त्र |
| ९. | डॉ. नंदकिशोर पांडुरंग चिताडे | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए.,बी.एड.,एम.फिल.,पीएच.डी. | अर्थशास्त्र |
| १०. | राजेश कचरू गायकवाड | सहयोगी प्राध्यापक | एम.ए., सेट, नेट | राज्यशास्त्र |
| ११. | डॉ. केशव दत्तराव तिडके | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., पीएच.डी., सेट | लोकप्रशासन |
| १२. | डॉ. संतोष हरिभाऊ कणसे | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी. | भूगोल |
| १३. | बाळासाहेब बब्रुवान गोरे | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए.,बी.एड.,एम.फिल. | भूगोल |
| १४. | प्रकर्ष रामकृष्ण काकडे | सहाय्यक प्राध्यापक | बी.ए.,एम.पी.एड.,एम.फिल. | संचालक शा.शि. |
| १५. | जयंत हंसराज मोरे | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए.,एम.लिब. & आय.एस.,एम.फिल. | ग्रंथपाल |
| ❊ तासिका तत्त्वावरील सहाय्यक प्राध्यापक ❊ | | | | |
| १. | सुनिल संपत्ती राऊत | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., बी.एड., नेट | राज्यशास्त्र |
| २. | अनिल उत्तम जोगदंड | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., सेट | लोकप्रशासन |
| ३. | रेणु शाहुराव झिरमिरे | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., पीएच.डी. | इंग्रजी |
| ४. | शाहरुख फारुख शेख | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए., बी.एड., सेट | समाजशास्त्र |

## ❊ सहयोगी व सहाय्यक प्राध्यापक - विज्ञान व वाणिज्य शारवा ❊

| अ.क्र. | नाव | पद | शैक्षणिक अहर्ता | विषय |
|---|---|---|---|---|
| १. | शिरीष बाळासाहेब भाकरे | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी., बी.एड. | रसायनशास्त्र |
| २. | अनंत कोंडीबा खंदाडे | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी., बी.एड., सेट | रसायनशास्त्र |
| ३. | सुशील सदाशिव राऊत | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी.,एम.ए.,बी.एड. | संगणकशास्त्र |
| ४. | भुषण प्रभाकर जोशी | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी., बी.एड. | संगणकशास्त्र |
| ५. | कैवल्य गोरखनाथ मरळकर | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. | भौतिकशास्त्र |
| ६. | सुचिता उत्तमराव देशमुख | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. | वनस्पतीशास्त्र |
| ७. | सुरेश अच्युतराव जाधव | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. | प्राणीशास्त्र |
| ८. | अनिता अनंतराव सोळंके | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. | प्राणीशास्त्र |
| ९. | प्राची दयानंद जाधव | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी., बी.एड. | गणित |
| १०. | अमोल अप्पासाहेब सोळंके | सहाय्यक प्राध्यापक | एम.कॉम., सेट | वाणिज्य |
| ११. | बाबुराव रामभाऊ मुंडे | सहाय्यक प्राध्यापक | एम.कॉम., बी.एड. | वाणिज्य |
| १२. | मिनाक्षी मधुकर उबाळे | सहाय्यक प्राध्यापक | एम.कॉम., एम.ए. | वाणिज्य |
| १३. | गणेश सखाराम लोखंडे | सहाय्यक प्राध्यापक | एम.कॉम. | वाणिज्य |

## ❊ प्रशासकीय कर्मचारी ❊

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. रमाकांत युवराज गोरे | मुख्य लिपीक |
| २. | श्री. सुधाकर विनायकराव गोडसे | कनिष्ठ लिपीक |
| ३. | श्री. श्रीकांत युवराज गोरे | कनिष्ठ लिपिक |
| ४. | श्री. बाळकृष्ण दिनकर साखरे | कनिष्ठ लिपिक |
| ५. | श्री. गणेश जगन्नाथ गोरे | सेवक |
| ६. | श्री. सुनिल वसंत माचवे | सेवक |
| ७. | श्रीमती शकुंतला प्रभाकर गायकवाड | सेवक |
| ८. | श्री. रविशंकर किसन शिंदे | सेवक |
| ९. | श्री. गणपत ज्ञानोबा बनसोडे | सेवक |

# * बी.ए.पदवी अभ्यास विषयाची संरचना *

| वर्ग | इंग्रजी (आवश्यक) | द्वितीय भाषा (हिंदी/मराठी) | ऐच्छिक विषय (एकूण तीन विषय) | | | एकुण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ऐच्छिक-१ | ऐच्छिक-२ | ऐच्छिक-३ | |
| बी.ए. प्रथम एकूण ८०० गुणांची परीक्षा ४००+४०० | ५० गुणांचा १ पेपर प्रथम सेमिस्टर | ५० गुणांचा १ पेपर प्रथम सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर प्रथम सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर प्रथम सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर प्रथम सेमिस्टर | ४०० |
| | ५० गुणांचा १ पेपर द्वितीय सेमिस्टर | ५० गुणांचा १ पेपर द्वितीय सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर द्वितीय सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर द्वितीय सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर द्वितीय सेमिस्टर | ४०० |
| बी.ए. द्वितीय एकूण ८०० गुणांची परीक्षा ४००+४०० | ५० गुणांचा १ पेपर तृत्तीय सेमिस्टर | ५० गुणांचा १ पेपर तृत्तीय सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर तृत्तीय सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर तृत्तीय सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर तृत्तीय सेमिस्टर | ४०० |
| | ५० गुणांचा १ पेपर चुतर्थ सेमिस्टर | ५० गुणांचा १ पेपर चुतर्थ सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर चुतर्थ सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर चुतर्थ सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर चुतर्थ सेमिस्टर | ४०० |
| बी.ए. तृतीय एकूण ८०० गुणांची परीक्षा ३५०+४५० | पाचव्या सेमिस्टरला मुख्य ऐच्छिक विषयाचा एक ५० गुणांचा अधिकचा पेपर असेल. | | ५० गुणांचा २ पेपर पाचवे सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर पाचवे सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर पाचवे सेमिस्टर | ३५० |
| | सहाव्या सेमिस्टरला मुख्य ऐच्छिक विषयाचा एक ५० गुणांचा अधिकचा पेपर व १०० गुणांचे प्रकल्प कार्य असेल. | | ५० गुणांचा २ पेपर सहावे सेमिस्टर व मेन विषयाचा १०० गुणांचा पेपर | ५० गुणांचा २ पेपर सहावे सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर सहावे सेमिस्टर | ४५० |
| | | | | | एकूण | २४०० |

टीप :

१) बी.ए. प्रथम वर्षासाठी अनिवार्य पेपर (संगणकशास्त्र) आहे. II Sem. (५० गुण)

२) बी.ए. द्वितीय वर्षासाठी अनिवार्य पेपर (पर्यावरणशास्त्र) आहे. IV Sem. (७५ गुण)

# * बी.कॉम. पदवी अभ्यास विषयाची संरचना *

| वर्ग | इंग्रजी<br>(आवश्यक) | द्वितीय भाषा<br>(हिंदी/मराठी) | अनिवार्य विषय ४ + १ (५) | | एकुण गुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | अनिवार्य-१, २, ३, ४ | अनिवार्य-१ | |
| बी.कॉम.<br>प्रथम वर्ष<br>प्रथम व द्वितीय<br>सत्र प्रत्येक सत्र<br>७००<br>गुणांची परीक्षा | ८० गुणांचा थेरी<br>पेपर व २०<br>गुण इंटरनल<br>एकूण-१०० | ८० गुणांचा थेरी<br>पेपर व २०<br>गुण इंटरनल<br>एकूण-१०० | ८० गुणांचा थेरी<br>पेपर व २०<br>गुण इंटरनल<br>एकूण-४०० | ५० गुणांचा थेरी<br>पेपर व ५०<br>गुण प्रात्येक्षीक<br>एकूण-१०० | प्रथम सत्र<br>७००<br>द्वितीय सत्र<br>७००<br>एकूण<br>१४०० |
| बी.कॉम.<br>द्वितीय वर्ष<br>तिसरे व चौथे<br>सत्र प्रत्येक सत्र<br>७००<br>गुणांची परीक्षा | ८० गुणांचा थेरी<br>पेपर व २०<br>गुण इंटरनल<br>एकूण-१०० | ८० गुणांचा थेरी<br>पेपर व २०<br>गुण इंटरनल<br>एकूण-१०० | ८० गुणांचा थेरी<br>पेपर व २०<br>गुण इंटरनल<br>एकूण-४०० | ५० गुणांचा थेरी<br>पेपर व ५०<br>गुण प्रात्येक्षीक<br>एकूण-१०० | तृतीय सत्र<br>७००<br>चौथे सत्र<br>७००<br>एकूण<br>१४०० |
| वर्ग | | | अनिवार्य विषय ४ + १ (५) | | एकुण गुण |
| | | | अनिवार्य-१, २, ३, ४, ५ | अनिवार्य-१ | |
| बी.कॉम.<br>तृतीय वर्ष<br>पाचवे व सहावे<br>सत्र प्रत्येक सत्र<br>६००<br>गुणांची परीक्षा | -------<br>-------| -------<br>------- | ८० गुणांचा थेरी<br>पेपर व २०<br>गुण इंटरनल<br>एकूण-५०० | ५० गुणांचा थेरी<br>पेपर व ५०<br>गुण प्रात्येक्षीक<br>एकूण-१०० | पाचवे सत्र<br>६००<br>सहावे सत्र<br>६००<br>एकूण<br>१२०० |
| | | | | एकूण | ४००० |

टीप : सदरील अभ्यासक्रम सी.बी.सी.एस. पॅटर्न प्रमाणे आहे.

१) बी.कॉम. प्रथम वर्षासाठी अनिवार्य पेपर (संगणकशास्त्र) आहे. II Sem. (५० गुण)

२) बी.कॉम. द्वितीय वर्षासाठी अनिवार्य पेपर (पर्यावरणशास्त्र) आहे. IV Sem. (७५ गुण)

# ✻ बी. एस्सी. पदवी अभ्यास विषयाची संरचना ✻

| वर्ग | इंग्रजी (आवश्यक) | द्वितीय भाषा (हिंदी/मराठी) | ऐच्छिक विषय (एकूण तीन विषय) | | | एकुण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ऐच्छिक-१ | ऐच्छिक-२ | ऐच्छिक-३ | |
| बी.एस्सी. प्रथम एकूण ११०० गुणांची परीक्षा ४००+७०० | ५० गुणांचा १ पेपर प्रथम सेमिस्टर | ५० गुणांचा १ पेपर प्रथम सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर प्रथम सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर प्रथम सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर प्रथम सेमिस्टर | ४०० |
| | ५० गुणांचा १ पेपर द्वितीय सेमिस्टर | ५० गुणांचा १ पेपर द्वितीय सेमिस्टर | ५० गुणांचे २ व १०० गुणांचे १ प्रात्यक्षिक द्वि.सेमि. | ५० गुणांचे २ व १०० गुणांचे १ प्रात्यक्षिक द्वि.सेमि. | ५० गुणांचे २ व १०० गुणांचे १ प्रात्यक्षिक द्वितीय सेमिस्टर | ७०० |
| बी.एस्सी. द्वितीय एकूण १४०० गुणांची परीक्षा ४००+१००० | ५० गुणांचा १ पेपर तृतीय सेमिस्टर | ५० गुणांचा १ पेपर तृतीय सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर तृतीय सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर तृतीय सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर तृतीय सेमिस्टर | ४०० |
| | ५० गुणांचा १ पेपर चुतर्थ सेमिस्टर | ५० गुणांचा १ पेपर चुतर्थ सेमिस्टर | ५० गुणांचे २ व १०० गुणांचे १ प्रात्यक्षिक द्वि.सेमि. | ५० गुणांचे २ व १०० गुणांचे १ प्रात्यक्षिक द्वि.सेमि. | ५० गुणांचे २ व १०० गुणांचे २ प्रात्यक्षिक चौथे सेमिस्टर | १००० |
| बी.एस्सी. तृतीय एकूण १२०० गुणांची परीक्षा ३००+९०० | ------- | ------- | ५० गुणांचा २ पेपर पाचवे सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर पाचवे सेमिस्टर | ५० गुणांचा २ पेपर पाचवे सेमिस्टर | ३०० |
| | ------- | ------- | ५० गुणांचे २ व १०० गुणांचे २ पेपर ६ वे.सेमि. | ५० गुणांचे २ व १०० गुणांचे २ पेपर ६ वे.सेमि. | ५० गुणांचे २ व १०० गुणांचे २ प्रात्यक्षिक सहावे सेमिस्टर | ९०० |
| | | | | | एकूण | ३७०० |

टीप :

१) बी.एस्सी. प्रथम वर्षासाठी अनिवार्य पेपर (संगणकशास्त्र) आहे. II Sem. (५० गुण)

२) बी.एस्सी. द्वितीय वर्षासाठी अनिवार्य पेपर (पर्यावरणशास्त्र) आहे. IV Sem. (७५ गुण)

३) गणित विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कार्याऐवजी (III,IV, V व VI) सत्रात अधिकचा ५० गुणांचा एक पेपर असेल.

## ❊ कला शाखा

### बी.ए.प्रथम वर्ष

अनिवार्य विषय : इंग्रजी (English)

द्वितीय भाषा : मराठी/हिन्दी

ऐच्छिक विषयाचे गट :

| गट | ऐच्छिक विषय |
|---|---|
| अ | इंग्रजी/मराठी/हिंदी |
| ब | भूगोल |
| क | राज्यशास्त्र/समाजशास्त्र |
| ड | इतिहास |
| ई | अर्थशास्त्र/लोकप्रशासन |

## ❊ वाणिज्य शाखा

### बी.कॉम. प्रथम वर्ष

अनिवार्य विषय : इंग्रजी (English)

द्वितीय भाषा : मराठी/हिन्दी

कॉमर्स पेपर्स

## ❊ विज्ञान शाखा

### बी.एस्सी. प्रथम वर्ष

अनिवार्य विषय : इंग्रजी (English)

द्वितीय भाषा : मराठी/हिन्दी

ऐच्छिक विषयाचे गट :

| गट | ऐच्छिक विषय |
|---|---|
| अ | रसायनशास्त्र Chemistry |
| ब | संगणकशास्त्र (Computer Science) |
| क | भौतिकशास्त्र (Physics) |
| ड | वनस्पतीशास्त्र (Botany) / गणित (Math) |
| ई | प्राणीशास्त्र (zoology) |

टीप :

१) बी.ए.व बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रथम वर्षासाठी निवडलेल्या विषयाचीच परीक्षा द्यावी लागते.

२) बी.ए. ही पदवी २४०० गुणांची, बी.एस्सी ही पदवी ३७०० गुणांची व बी.कॉम. ४००० गुणांची असेल.

## ⁕ प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे :

प्रवेश अजोसोबत खालील मूळ प्रमाणपत्रे व प्रत्येकाच्या दोन प्रमाणित सत्यप्रती जोडाव्यात.

१) गुणपत्रिका.

२) शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र.

३) वर्गीकृत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, व्ही.जे.एन.टी. ओबीसीचा दाखला.

४) स्थलांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट) विद्यापीठाबाहेरील विद्यार्थ्यांसाठी.

५) विद्यापीठ योग्यता प्रमाणपत्र (इलिजीब्लिटी सर्फिफिकेट)

६) उत्पन्नाचा दाखला (तहसिलदारांचा).

७) पासपोर्ट साईज फोटोच्या रंगीत २ प्रती.

### ⁕ आरक्षणासंबंधी महत्त्वाच्या सूचना ⁕

**अ) घटनात्मक आरक्षण :**

सर्व वर्गासाठी प्रवेश हे गुणवत्तेच्या आधारे देण्यात येतील. प्रवेश हे मंजूर असलेल्या तुकड्यांतील प्रवेश क्षमतेप्रमाणे दिले जातील. नावनोंदणीची मुदत संपल्यानंतर वर्गनिहाय गुणवत्ता याद्या प्रसिद्ध केल्या जातील व शासकीय नियमानुसार आरक्षण असेल.

| अ.क्र. | प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३% |
| २ | अनुसूचित जमाती | ७% |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३% |
| ४ | भटक्या जाती (ब) | २.५% |
| ५ | भटक्या जामती (क) | ३.५% |
| ६ | भटक्या जमाती (ड) | २% |
| ७ | इतर मागास वर्ग | १९% |
| ८ | आर्थिक मागास वर्ग | १०% |
| | एकूण | ६०% |

**ब) समांतर आरक्षण :**

बदली , आजी –माजी सैनिकांचे पाल्य, क्रीडागट, कला गट, अपंग गट यांना नियमाप्रमाणे आरक्षण दिले जाईल.

**✻ शिष्यवृत्ती आणि सवलती ✻**

✻ केंद्र सरकार व राज्य सरकार तर्फे पात्र विद्यार्थ्यांना खालील प्रकारची शिष्यवृत्ती मिळू शकते.

✻ भारत सरकर शिष्यवृत्ती योजना (GOI).

✻ अल्पसंख्याक शिष्यवृत्ती.

✻ अपंग विद्यार्थी केंद्रीय शासन शिष्यवृत्ती

✻ गुणवत्ता शिष्यवृत्ती.

✻ स्वातंत्र्य सैनिकांच्या मुला–मुलींना मिळणारी आर्थिक सवलत.

✻ प्राथमिक शिक्षकांच्या मुला–मुलींना मिळणारी शिष्यवृत्ती.

✻ राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती.

या व्यतिरिक्त शासनाच्या नियमानुसार मिळणारी शिष्यवृत्ती.

नोट : शासन नियमानुसार शिष्यवृत्ती फॉर्म ऑनलाईन भरुन दाखल करावे लागतील.

शिष्यवृत्तीबाबत अधिक चौकशी कार्यालयात करावी.

**✻ शिष्यवृत्तीसाठी खालील बाबी आवश्यक आहेत.**

✻ वार्षिक उत्पन्नाचा मूळ दाखला.

✻ जातीचे प्रमाणपत्र (सत्यप्रत.).

✻ महाविद्यालय सोडल्याचा दाखला (टी.सी.) (सत्यप्रत).

✻ गुणपत्रिकेची सत्यप्रत.

✻ मागील वर्षातील शिष्यवृत्ती आदेश क्रमांक.

✻ पासपोर्ट साईज फोटो.

✻ शिष्यवृत्तीधारक प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी बँकेत स्वतःचे खाते उघडणे आवश्यक आहे.

✻ नियमानुसार ७५% उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल.

## * ग्रंथालय

महाविद्यालयाचे सुसज्ज आणि समृद्ध ग्रंथालय आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे १००% संगणकीकरण झालेले आहे.

१) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथालय सभासदत्व फॉर्म भरणे अनिवार्य आहे.

२) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क रु. २५/- भरुन संगणकीय ओळखपत्र घ्यावे लागेल.

३) पुस्तकांच्या देवाण-घेवाणीसाठी ग्रंथालय कार्ड व ओळखपत्र आवश्यक आहे.

४) ग्रंथालय कार्डावर एकावेळी २ पुस्तके आठवड्यासाठी मिळतील.

५) डुप्लिकेट ओळखपत्रासाठी रु. ३०/- शुल्क आकारण्यात येईल.

६) निर्धारित वेळेच्या आत पुस्तके परत न केल्यास एका पुस्तकासाठी दर दिवस रु. १ प्रमाणे दंड आकारला जाईल.

७) ग्रंथालयातून ग्रंथ घेत असताना त्याची पाने तपासून घ्यावीत.

८) ग्रंथाची पाने फाडल्यावर झेरॉक्स चार्ज प्रती पेज रु. १/- व ग्रंथ बांधणी शुल्क रु. ३० आकारण्यात येईल.

९) पुस्तके फाटल्यास वा गहाळ केल्यास पुस्तकांची दुप्पट रक्कम वसूल केली जाईल किंवा नवीन ग्रंथ उपलब्ध करुन द्यावा लागेल.

१०) वार्षिक परीक्षेपूर्वी पुस्तके परत करावीत अथवा पुस्तकाच्या किंमती इतकी अनामत रक्कम जमा करुन पुस्तके घेता येतील.

११) संदर्भग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे वाचन कक्षात उपलब्ध होतील ते घरी घेऊन जाता येणार नाहीत.

१२) ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांशी असभ्य वर्तन करणे व शिस्त न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय सवलती बंद केल्या जातील.

१३) शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच वाचनकक्ष व रात्रीची अभ्यासिका चालू राहील.

१४) ग्रंथालयासंदर्भात विद्यार्थ्यांच्या काही तक्रारी असल्यास त्या लेखी स्वरुपात वाचनकक्षातील सूचना पेटीत टाकाव्यात.

## ✻ प्रयोगशाळा ✻

- ✻ भौतीकशास्त्र प्रयोगशाळा (Physics Labrotary)
- ✻ जीवनशास्त्र प्रयोगशाळा (Biology Labrotary)
- ✻ रसायनशास्त्र प्रयोगशाळा (Chemistry Labrotary)
- ✻ भुगोल प्रयोगशाळा (Geography Labrotary)
- ✻ संगणकशास्त्र प्रयोगशाळा (Computer Labrotary)
- ✻ भाषा प्रयोगशाळा (Language Labrotary)

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे ज्ञान मिळावे. अध्ययन अनुभव घेता यावा, नवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी उपरोक्त प्रयोगशाळा महाविद्यालयात आहेत. या प्रयोगशाळेत सर्व प्रात्यक्षिकांचे साहित्य, इंटरनेटची सुविधा, सॉफ्टवेअर व तंत्रज्ञानाविषयक सर्व साहित्य उपलब्ध आहे. याचा लाभ विद्यार्थी घेत असतात.

## ✻ "कृष्णाई" वार्षिक अंक ✻

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त लेखन कला गुणांना वाव मिळावा. त्यांची सृजनशीलता विकसीत व्हावी, मर्मज्ञता प्रकट व्हावी यासाठी महाविद्यालयातर्फे "कृष्णाई" या नावाने वार्षिक अंक प्रसिद्ध केला जातो. यामध्ये वैचारिक लेख, कथा, कविता, चुटकुले, चारोळी व इतर साहित्याचा समावेश असतो. वर्षभरातील विविध विभागांचा अहवाल, कार्यक्रमांच्या छायाचित्रांचाही यात समावेश केला जातो.

## ✻ वाङ्मय मंडळ ✻

शैक्षणिक वर्ष सुरु झाल्याबरोबर महाविद्यालयात मराठी, हिंदी व इंग्रजी विषयासाठी स्वतंत्र वाङ्मय मंडळाची स्थापना केली जाते. या मंडळाद्वारे लेखन कौशल्य वाढावे, सृजनशीलता वृध्दींगत व्हावी, युवकांमधील रसिकता फुलावी, आकलन क्षमतेचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांत आवड व अभिवृती निर्माण व्हावी, त्यांच्यातला लेखक जागा व्हावा, यासाठी वाङ्मय मंडळ अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित करत असते. विद्यार्थ्यांना अनेक लेखक, वक्ते व तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जाते. या मंडळाच्या वतीने अनेक प्रसंगनुरुप भित्तीपत्रकांची निर्मिती केली जाते.

## ✻ क्रीडा विभाग ✻

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा. युवकांच्या अंगी खिलाडूवृत्ती वृद्धींगत व्हावी. 'सुदृढ शरीरात निकोप मन असते' या म्हणीप्रमाणे त्यांचे शरीर निरोगी रहावे, विद्यार्थ्यांना देशी-विदेशी खेळांची माहिती मिळावी, विद्यार्थी विविध खेळांत पारंगत व्हावेत, काही विद्यार्थ्यांनी खेळाच्या माध्यमातून स्वतःचे करीअर घडवावे यासाठी महाविद्यालयातील क्रीडा विभाग नेहमी प्रयत्नशील असतो. महाविद्यालयातील विद्यार्थी आंतरमहाविद्यालयीन तसेच आंतर विद्यापीठीय स्तरावरील अनेक क्रीडा प्रकारांत सहभागी असतात. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ व आंतर विद्यापीठ पातळीवरील अनेक पारितोषिके पटकाविली आहेत.

### ✻ इनडोअर हॉल

महाविद्यालयाने यु.जी.सी.च्या XI व्या योजनेत मिळालेल्या फंडातून सुसज्ज व सर्व सोयींनीयुक्त इनडोअर हॉल बांधलेला आहे. या हॉलमध्ये बॅडमिंटनसाठी ऊडनचे दोन कोर्ट आहेत. त्याचप्रमाणे टेबल टेनीस, कॅरम, चेस व इतर सर्व इनडोअर खेळाची सुविधा उपलब्ध आहे. ज्याचा लाभ विद्यार्थी घेत असतात.

### ✻ जीमनॅशीअम हॉल :

महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र Gym ची सुविधा उपलब्ध आहे. यात वेगवेगळ्या प्रकारचे Gym चे साहित्य उपलब्ध आहे.

### ✻ आऊटडोअर खेळाचे मैदान :

महाविद्यालयाच्या समोर प्रशस्त असे क्रीडांगण उपलब्ध आहे. या मैदानावर कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, उंच उडी, लांब उडी, क्रिकेट व अ‍ॅथेलेटीक्स इत्यादी खेळ विद्यार्थी खेळत असतात. महाविद्यालयात या व्यतिरिक्तच्या क्रीडा प्रकाराचे साहित्य उपलब्ध आहे.

## ✻ राष्ट्रीय सेवा योजना ✻

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून राष्ट्रीय सेवा योजना विभाग महाविद्यालयात कार्यरत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झालेली आहे.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच समाजसेवा करणे, जवळच्या परिसरातील लोकांमध्ये मिसळून त्यांना समजावून घेऊन रचनात्मक कार्य करणे. समाजसेवेच्या माध्यमातून स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे, हा योजनेचा उद्देश आहे.

### * नियमित कार्यक्रम

या कार्यक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक वर्षात १२० तास समाजसेवेचे काम करावे लागते. या कार्यक्रमांतर्गत रक्तदान शिबीर, वृक्षरोपन, रोगनिदान शिबीर, ग्रामसफाई, साक्षरता, पर्यावरण, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सामंजस्य, मोफत रक्तगट तपासणी, एड्स जनजागरण, रोगप्रतिबंधक लसीकरण, मतदार जनजागृती, लैगिंक समानता व महिलांसाठी विविध कार्यक्रम, शाळा दत्तक योजना, नेतृत्वगुण विकास शिबीर इ. कार्यक्रमांचा समावेश होतो.

### * विशेष शिबीर कार्यक्रम

महाविद्यालय वर्षातून एकदा सात दिवसांचे निवासी विशेष शिबीर परिसरातील एका गावी आयोजित करते. या सात दिवसीय शिबीरामध्ये सामाजिक विषयांवर जनजागृती, आरोग्यविषयक कार्यक्रम, पर्यावरण (वृक्षारोपण, जलसंवर्धन, बंधारे बांधणी, रस्ते बांधणी), साक्षरता अभियान, आपत्कालीन सेवा, राष्ट्रीय एकात्मता व सद्भावना कार्यक्रम, स्त्रियांसाठीचे कार्यक्रम व इतर अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महाविद्यालयात नियमित कार्यक्रमांसाठी २५० आणि विशेष शिबीर कार्यक्रमांसाठी १२५ विद्यार्थी विद्यापीठाने मान्य केलेली आहे.

## * विद्यार्थी परिषद *

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ २०१६ प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी परिषद गठीत करण्यात येईल. यात खालील सदस्यांचा समावेश असेल.

अ) अध्यक्ष ब) सचिव क) विद्यार्थिनी प्रतिनिधी ड) प्रत्येक वर्गातून एक प्रतिनिधी इ) राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी ई) क्रीडा प्रतिनिधी

ए) सांस्कृतिक प्रतिनिधी

नोट: शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० साठीच्या विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका या महाराष्ट्रात सार्वजनिक विद्यापीठ कायदा व डॉ. बा.आं.म. विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार घेतल्या याची नोदं घ्यावी.

## ✻ वाणिज्य, विज्ञान व सामाजिक शास्त्रे मंडळ ✻

कला शाखेअंतर्गत भाषा विषयाव्यतिरिक्त इतर विषयांसाठी सामाजिक शास्त्रे मंडळाची स्थापना केली जाते तर वाणिज्य शाखा व विज्ञान शाखेअंतर्गत वाणिज्य आणि विज्ञान मंडळाची स्थापना केली जाते. या मंडळाअंतर्गत वर्षभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

## ✻ मनोहरराव गोरे आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा ✻

महाविद्यालयाचे प्रेरणास्थान आदरणीय मनोहरराव गोरे यांच्या नावाने दरवर्षी मराठवाडा पातळीवर आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले जाते.

## ✻ शिवाजी व्यारव्यानमाला ✻

महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्मचारी, विद्यार्थी व परिसरातील नागरिक यांचे प्रबोधन व्हावे, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, विचारांना चालना मिळावी यासाठी महाविद्यालय यावर्षापासून "शिवाजी स्मृती व्याख्यानमाला" सुरु करत आहे.

## ✻ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र ✻

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवेत जाता यावे, त्यांना स्पर्धा परीक्षांना सामोरे जाता यावे, यासाठी या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांची तयारी करुन घेतलीजाते. आमचे तज्ञ प्राध्यापक त्यांना मार्गदर्शन करतात त्याचप्रमाणे बाहेरील प्रशासकीय सेवेतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाते. ग्रंथालयात स्पर्धा परीक्षांची पुस्तके व मासिके त्यांच्यासाठी उपलब्ध करुन दिलेली आहेत. त्याच प्रमाणे संगणक प्रयोगशाळेत त्यांना इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

## ✻ महिला वसतिगृह ✻

महाविद्यालयाच्या परिसरात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या XI व्या योजनेअंतर्गत महाविद्यालयाला मिळालेल्या अनुदानातून सुसज्ज अशी महिला वसतिगृहाची इमारत बांधलेली आहे. या वसतिगृहात ५० विद्यार्थिनींची निवासाची सोय आहे. यात नियमाप्रमाणे प्रवेश दिले जातील. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थिनींना वसतिगृहाचे नियम बंधनकारक राहतील.

## ❊ सायकल स्टँड ❊

१) वाहनधारक विद्यार्थ्यांनी आपले वाहन सायकल स्टँडवरच ठेवणे बंधनकारक आहे.

२) सायकल अथवा मोपेड कुलुप लावल्याशिवाय ठेवू नये.

३) सायकल व मोपेड एका रेषेतच लावावीत. वाकडे तिकडे लावू नयेत.

## ❊ शैक्षणिक सहल ❊

शैक्षणिक सहल हा अध्ययन-अध्यापनाचाच एक भाग असतो. विद्यार्थ्यांना भूप्रदेशाची, शहरांची, प्राचीन ऐतिहासिक बाबींची व विषयाशी संबंधित अधिकची माहिती मिळावी व शैक्षणिक अनुभूती यावी यासाठी महाविद्यालयातर्फे शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते. सहलीचे आयोजन शक्यतो दीपावलीच्या सुट्टीतच केले जाते. सहलीचे आयोजन त्या त्या परिस्थितीवर अवलंबून असेल.

## ❊ सांस्कृतिक विभाग ❊

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन दिले जाते. विद्यार्थी हा आमचा केंद्रबिंदू आहे. या विभागामार्फत वर्षभर विद्यार्थ्यांना अनेक कलाप्रकारात सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित केले जाते. गॅदरींग, आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव, सण, उत्सव व प्रसंगानुरुप होणारे कार्यक्रम यात विद्यार्थ्यांची या विभागामार्फत तयारी करुन घेतली जाते व त्यांचा सहभाग वाढेल यावर भर दिला जातो. सांस्कृतिक विभागामार्फत वर्षभर कार्यक्रमाची रेलचेल असते. याचा विद्यार्थी फायदा घेतात.

## ✻ युवती मंडळ ✻

महाविद्यालयात युवतींसाठी खास व्यासपीठ उपलब्ध करुन दिले जाते. यासाठी युवती मंडळाची स्थापना केली जाते. हे व्यासपीठ युवतींच्या विकासासाठी प्रयत्नशील असून, युवतींनी स्वतंत्र व निर्भय व्हावे, स्वतंत्रपणे विचार, अभिव्यक्ती, आविष्कार प्रगट करण्याचे कौशल्य त्यांच्यामध्ये निर्माण व्हावे, त्यांची सृजनशीलता विकसित व्हावी यासाठी युवती मंडळाच्या माध्यमातून विविध उपक्रम महाविद्यालयात राबविले जातात.

## ✻ "जनविकास भूषण" पुरस्कार ✻

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून प्रत्येक वर्षाला तृतीय वर्षातील एका विद्यार्थ्याला "जनविकास भूषण " पुरस्कार दिला जाईल. महाविद्यालयाने गठीत केलेल्या निवड समितीद्वारे या विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. ही निवड करताना खालील निकषांचा आधार घेतला जाईल.

✻ विद्यार्थी अभ्यासक्रमात नेत्रदीपक यश संपादन करणारा असावा.

✻ महाविद्यालयात वर्षभरातील उपक्रमातील सहभाग.

✻ वर्षभरात महाविद्यालयातील उपक्रमातील सहभाग.

✻ प्राध्यापक, कार्यालय व इतर मित्रांबरोबरचा त्याचा सलोख्याचा संबंध.

✻ त्याच्या अंगातील विनम्रपणा.

✻ एकूण विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व पाहून गठित समितीने केलेल्या शिफारशीवरुन "जनविकास भूषण" हा पुरस्कार दिला जाईल.

*** महाविद्यालयाचे नियम व अटी ***

* **नियमित उपस्थिती :**

१) प्रत्येक तासाला विद्यार्थ्यांची उपस्थिती घेतली जाते.

२) प्रत्येक विषयाची दरमहा किमान ७५ % उपस्थिती बंधनकारक आहे.

३) सतत गैरहजर राहिल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.

४) घटक चाचण्या, गृहपाठ, प्रात्यक्षिक (Practical) व सत्र परीक्षा बंधनकारक आहेत.

५) प्रत्येक महिन्यातील उपस्थिती ७५ % पेक्षा कमी असल्यास

- दंड आकारला जातो.
- पाल्यांना SMS द्वारे कळविले जाते.
- सततच्या गैरहजेरीबद्दल विद्यार्थ्यास ताकीद दिली जाते.
- सतत गैरहजर राहिल्यास प्रवेश रद्द करण्यात येतो.

* **परीक्षा :**

१) महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या घटक चाचणी/प्रथमसत्र/सराव व वार्षिक इ. परीक्षा देणे विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य आहे.

२) परीक्षेत विना परवानगी अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो.

३) परीक्षेत सर्वाधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात आणि त्यांची नावे श्रेयफलकावर लिहिले जातात.

* **शिस्त :**

१) सर्व विद्यार्थ्यांनी परिसरात व वर्गात शांतता पाळणे आवश्यक आहे.

२) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने दिलेले ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे.

३) महाविद्यालयात गणवेशात येणे बंधनकारक आहे.

४) महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल वापरास बंदी आहे.

५) विद्यार्थ्यांनी आपली वाहने पार्किंगमध्येच लावावीत.

६) तासिका सुरु असतांना व्हरांड्यात फिरु नये.

७) महाविद्यालयाबाहेरील विद्यार्थ्यांना सोबत आणू नये.

८) विद्यार्थ्यांनी सर्वांशी सौजन्याने वागावे.

※ **खालील कृत्यांचा शिस्तभंगात समावेश होतो**

१) ओळखपत्र आणि गणवेशाशिवाय महाविद्यालयात येणे.

२) वर्ग चालू असताना व्हरांड्यात रेंगाळणे किंवा वर्गासमोर उभे राहून विक्षिप्त हालचाली करणे.

३) महाविद्यालयाच्या इमारतीवर, डेक्सवर, बाथरुम व टॉयलेटच्या भिंतीवर, फलकावर असभ्य मजकूर लिहिणे व चित्रे काढणे.

४) विद्यार्थीनींची छेडछाड करणे.

५) वर्गातील/प्रयोगशाळेतील/क्रीडा विभागातील/परिसरातील सामानाची मोडतोड करणे, चोरी करणे, ग्रंथालयातील पुस्तके फाडणे इ.

६) प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी उद्धट वर्तन करणे.

७) महाविद्यालयाच्या परिसरात गटबाजी करणे, भांडण करणे, गोंधळ घालणे, हुल्लडबाजी करणे इ.

८) महाविद्यालयाच्या परिसरात गुटखा, तंबाखू, पान खाण्यास व सिगारेट ओढण्यास सक्त बंदी घालण्यात आलेली आहे. आढळून आल्यास कडक कारवाई केली जाईल.

**※ पालकांसाठी महत्त्वाच्या सूचना ※**

१) विद्यार्थी सातत्याने गैरहजर असेल तर पालकांशी संपूर्क साधून प्रत्यक्ष भेटण्याची सूचना दिली जाते. यावेळी पालकांनी प्रतिसाद देणे अपेक्षित आहे.

२) महाविद्यालयातून फोन आल्यास त्याला तातडीने योग्य तो प्रतिसाद देऊन सहकार्य करावे. फोनवर महाविद्यालयाच्या शिक्षक/कर्मचाऱ्यांशी असभ्य, अर्वाच्च भाषेचा वापर करु नये.

३) प्राध्यापकांशी परस्पर अथवा इतर कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष अथवा फोनवरुन उद्धट भाषेत बोलणे, दरडावणे, धमकी देणे इत्यादी गोष्टी बेशिस्त वर्तन म्हणून गृहीत धरल्या जातील व योग्य ती कार्यवाही केली जाईल.

४) प्रत्येक पालक बैठकीस उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

* **Anti Ragging Policy (U.G.C. Notice)**

  In pursuance to the judgment of the Hon'ble Supreme Court of India dated 08.05.2009 in Civil Appeal No. 887/2009, the University Grants Commission has framed "UGC Regulations on curbing the menace of ragging in higher educational institutions, 2009" which have been notified on 4th July 2009 in the Gazette of India. These regulations are mandatory for all Universities/Institutions. The UGC has made it mandatory for all students/parents to submit anti ragging related affidavits to the institutions at the time of admission.

  Now it is brought to the notice of all Universities, Institution, Students and Parents that these Affidavits can be downloaded from the web site of UGC and or related other websites.

* **Curbing the Menace of Ragging in Higher Education Institutions**

  It is brought to the notice of All students that ragging is a criminal offence and that UGC has framed UGC Regulations on curbing the menace of ragging in Higher Educational Institutions,2009, in order to prohibit, prevent and eliminate the scourge of ragging in indian Universities/Institutions.

  The above regulations are mandatory and all Intuitions should take necessary steps for its implementation udner intimation th the UGC. Students in distress owing to ragging related incidents can access the Toll Free Helpline 180-5522 or contact Ed.CIL (India) Limited, Ed. CIL House, 18A, Sector-16A, Noida-201 301, UP.

* **What constitues Ragging?**

  Ragging Constitues one more of any of the following acts:

a. Any conduct by any student or students whether by words spoken or written or by an act which has the effect of teasing. treating or handling with rudeness a fresher or any other student;

b. Indulging rowdy or undisciplined activities by any student or students which causes or is likely to cause annoyance, hardship, physical or psychological harm or to raise fear or apprehension there of in any other student.

c. Asking any student to do any act which such student will not in the ordinary course do and which has the effect of causing or generating a sense of shame, or torment or embarrassment so as to adversely affect the physique or psyche of such fresher or any other student;

d. Any act by a senior student that prevents, disrupts or disturbs the regular academic activity of any other student or a fresher;

e. Exploiting the services of a fresher or any other student for completing the academic tasks assigned to an individual or a group of students.

f. Any act of financial extortion or forceful expenditure burden put on a fresher or any other student by students;

g. Any act of physical abuse including all variants of it: sexual abuse, homosexual assaults, stripping, forcing obscene and lewd acts, gestures, causing bodily harm or any other danger to health or person;

h. Any act or abuse by spoen words, emails, post, public insults which would also include deriving perverted pleasure, vicarious or sadistic thrill from actively or passively participating in the discomfiture to fresher or any other student;

I. Any act that affects the mental health and self-confidence of a fresher or any other student with or without an intent to derrive a sadistic pleasure or showing off power, authority or superiority by a student over any fresher or any other student.

✲ **Punishable ingredients of Ragging :**

✲ Ragging and Abetment of Ragging.

✲ Unlawful assembly or rioting while Ragging.

✲ Public nuisance created during ragging.

✲ Violation of decency and morals while ragging or such unlawful assembly.

✲ Wrongful restraint or confinement.

✲ Use of criminal force or assault.

✲ Attempt to commit any of the above.

✲ All other offences or attempt to commit such offences flowing from the definition of ragging.

✻ **Punsihment for Participation in/or Abetment of Ragging :**

1. Cancellation of admission.
2. Suspension from attending classes.
3. Withholding/withdrawing scholarship/fellowship and other benefits.
4. Debarring from appearing in any test/examination other evaluation process.
5. Withholding results.
6. Debarring from representing the institution in any national or international meet, tournament, youth festival, etc.
7. Suspension/expulsion from the hostel.
8. Rustication from the institution for periods varying from 1 to 4 semesters or equivalent
9. Expulsion from the institution and consequent debarring from admission to any other institution.

# * गुणवंत विद्यार्थी पुरस्कार योजना *

| अ.क्र. | वर्ग | विषय | पुरस्कार | प्रायोजकाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | बी.ए., बी.कॉम. बी.एस्सी. | विद्यापीठ गुणवत्ता यादीत समाविष्ट | गुणवंत विद्यार्थी पुरस्कार | प्राचार्य डॉ.बी.एम.गोरे | ३००१ |
| २. | युवक महोत्सव | विद्यापीठ पातळीवर क्रमांक मिळाल्यास | सूजन पुरस्कार | प्राचार्य डॉ.बी.एम.गोरे | २००१ |
| ३. | क्रीडा स्पर्धा | | मनोहरराव गोरे क्रीडा पुरस्कार | प्राचार्य डॉ.बी.एम.गोरे | |
| ४. | बी.ए.तृतीय वर्ष | इंग्रजी | कै. यमुनाबाई गोरे | प्राचार्य डॉ.बी.एम.गोरे | १००१ |
| ५. | बी.ए.,बी.कॉम. बी.एस्सी. | क्रीडा | शिवछत्रपती | प्रा.पी.आर.काकडे | १००१ |
| ६. | बी.ए. द्वितीय | भूगोल | वसुंधरा | प्रा.बी.बी.गोरे | ७५१ |
| ७. | बी.ए.तृतीय वर्ष | हिन्दी | कै. तात्याराव लहाडे | प्रा.डॉ.एम.ए.लहाडे | ५०१ |
| ८. | बी.ए.प्रथम | भूगोल | कै. गीतांजली उत्तमराव जाधव | प्रा.डॉ.एस.एच.कणसे | ५०१ |
| ९. | बी.ए.तृतीय | भूगोल | कै. निवृत्तीनाथ पिसाळ | प्रा.डॉ.एच.जी.पिसाळ | ५०१ |
| १०. | बी.ए.तृतीय | उत्कृष्ट वाचक | कै.एस.आर.रंगनाथ | प्रा.जे.एच.मोरे | ५०१ |
| ११. | बी.ए.तृतीय | अर्थशास्त्र | डॉ.अमर्त्यसेन | प्रा.डॉ.एन.पी.चिताडे | ५०१ |
| १२. | बी.ए.तृतीय | इतिहास | राष्ट्रमाता जिजाऊ | प्रा.डॉ.एस.आर.कदम | ५०१ |
| १३. | बी.ए.तृतीय | लोकप्रशासन | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर | प्रा.डॉ.के.डी. तिडके | ५०१ |
| १४. | बी.ए.तृतीय | राज्यशास्त्र | डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा.आर.के.गायकवाड | ५०१ |
| १५. | बी.ए.,बी.कॉम. बी.एस्सी.द्वितीय वर्ष (S.L.) | हिदी | कै. निवृत्ती भोसले | प्रा.डॉ. जी.एस.भोसले | ५०१ |
| १६. | बी.ए.तृतीय वर्ष | मराठी | कै. पार्वतीबाई धोंडीराम पिटाले | प्रा.डॉ. एम.एस.कांबळे | ५०१ |
| १७. | बी.ए.द्वितीय वर्ष | मराठी | कै. रानबा तात्याराम गुळभिले | प्रा.डॉ.एस.डी.मोरे | ५०१ |
| १८. | बी.ए.तृतीय वर्ष | समाजशास्त्र | कै. सदाशिव भागोजी मोटे | प्रा.डॉ. जी.एस.मोटे | ५०१ |



**Indoor Sports Hall**



**Library**



**College Premises**



**Gym**



**Women's Hostel**



**Geography Lab**

# महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

* प्रशस्त, अत्याधुनिक, सर्व सुविधांनीयुक्त सुसज्ज इमारत.
* संगणकिकृत व आधुनिक सुसज्ज ग्रंथालय.
* सुजज्ज रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र प्रयोगशाळा.
* सुसज्ज भुगोल विषयाची प्रयोगशाळा.
* संगणक तंत्रज्ञान प्रयोगशाळा इंटरनेट वाय-फाय सुविधेसह.
* बॉटनिकल गार्डन.
* खेळासाठी प्रशस्त इनडोअर हॉलची सुविधा.
* अत्याधुनिक उपकरणासह व प्रशिक्षकासहित जीम ची सोय.
* खेळासाठी प्रशस्त मैदान.
* गरजु विद्यार्थीनींसाठी अत्यल्प दरात वसतिगृहाची सुविधा.

